08-02-2025-Dai-01new_DH_PAN_01_04_2016-1.qxp  07-02-2025  22:51  Page 1



दोषीवर कडक कारवाई अवश्य केली जाणार
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



हार्दिक पंड्या पुन्हा होणार कर्णधार!
पान ४ वर

वेर्णा, शनिवार, ८ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 156 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 8 February 2025 | Pages 4 | ₹ 4

# 'कोळसा' कर वसूलीतल्या ढिलाईवरुन अधिवेशन तापले!

## २१०० कोटी वसूली असताना केवळ २३७ कोटीच वसूल युरी आलेमाव यांनी केला घोटाळ्याचा आरोप

■ टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. ७ : मुरगाव बंदरातून पाठवण्यात येणाऱ्या कोळश्यावर आकारण्यात आलेल्या ' ग्रीन सेस ' वसुलीत सरकार एक दोन नाही तर गेली दहा वर्षे कोळसा कंपन्यांना कोट्यवधींची सूट का देत आहे ? असा सवाल उपस्थित करीत विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनी अधिवेशनात मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांना धारेवर धरले. २०१४ मध्ये राज्य सरकारने हा अधीभार लागू केल्यानंतर गेल्या दहा वर्षात अगदी अर्ध्या टक्क्याने जरी हा टॅक्स वसूल केला तरीही सरकारच्या तिजोरीत २१०० कोटीहून अधिक रक्कम जमा व्हायला हवी होती , मात्र प्रत्यक्षात ' ग्रीन सेस' पोटी केवळ २३७ कोटीच वसूल झाले असल्याने यात मोठा घोटाळा झाला असल्याचा आरोप युरी आलेमाव यांनी केला. आलेमाव यांच्या आरोपानंतर विरोधक चांगलेच आक्रमक झाले.**

अधिवेशनाच्या प्रश्नोत्तर तासादरम्यान विरोधी पक्ष नेते युरी आलेमाव यांनी मुरगाव बंदरात कोळसा हाताळणी करणाऱ्या कंपन्यांवर सरकारची विशेष मर्जी असल्याचा आरोप करत 'ग्रीन सेस' आकारणीत कोट्यवधीचा घोटाळा झाला असल्याचा खळबळजनक आरोप केला. कोळशाचा सरासरी २ हजार रुपये असताना सरकार गेल्या दहा वर्षात केवळ २३७ कोटीच रुपये कसे काय वसूल करते? वास्तवीक मुरगाव बंदरात सुरू असलेल्या वेगेवेगळ्या

'ऑपरेशन्स'वर लागू होणाऱ्या 'ग्रीन सेस' पोटी सरकारच्या तिजोरीत ८ हजार कोटी रुपये यायला हवेत असा दावा आलेमांव यांनी केला. अगदीच नाही तर कोळसा हाताळणीच्या बाबतीत अर्धा टक्का जरी, 'ग्रीन सेस' आकारायचा म्हटला तरी सरकारच्या तिजोरीत गेल्या दहा वर्षात २१०० कोटी जमा होणे गरजेचे होते . तसे न होता केवळ २३७ कोटीच जमा झाले . त्यातही १९० कोटी रुपये पेट्रोलियम कंपन्यांनी भरले आहेत आणि कोळसा हाताळणीतून सरकारला गेल्या दहा वर्षात ' ग्रीन सेस' पोटी केवळ ४७ कोटी महसूल मिळाला आहे. त्यामुळे मोठया कोळसा कंपन्यांवर सरकारची ही मेहरबानी कशासाठी? असा प्रश्न उपस्थित करीत आलेमाव यांनी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांना सभागृहात चांगलेच धारेवर धरले. विरोधी पक्षाच्या अन्य आमदारांनीही आलेमाव यांना पाठिंबा व्यक्त करीत सरकारवर घोटाळ्याचा आरोप करीत सभागृह दणाणून सोडले . अर्ध्या तासापेक्षाही जास्त काळ सभागृहात वाद विवाद सुरू होते.

या प्रश्नाचे उत्तर सरकारने दिल्याशिवाय चर्चा थांबवू देणार नाही अशी भुमिका विरोधी पक्षांनी घेतल्यानंतर मुख्यमंत्र्यांना याबाबतीत खुलासा करणे भाग पडले. मुख्यमंत्री म्हणाले की , 'ग्रीन सेस ' ची ५० टक्के रक्कम सरकारने कोळसा आणि पेट्रोलियम कंपन्यांकडून वसूल केली आहे . परंतु काही कंपन्या सरकारने लावलेल्या अधीभाराच्या विरोधात न्यायालयात गेल्या आहेत. हा विषय सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबीत आहे. या आधी सेस आकारणी बाबत नवीनतम ऊर्जा मंत्रालयाने राज्य विक्रीकर आयुक्तालयाला पत्र लिहिले असून मुरगाव बंदरात नेमका किती कोळसा हाताळला जातो याची आकडेवारी गोवा प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मिळवली आहे .सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी दिलेल्या अंतरीम आदेशानुसार या कंपन्यांनी अधीभाराच्या ५० टक्के रक्कम जमा केली आहे . त्यामुळे न्यायालयाचा अंतिम निर्णय आल्यानंतर सरकार , 'ग्रीन सेस' ची शंभर टक्के वसूली करणार असल्याची ग्वाही

पान २ ▶

### कोणत्याही कोकण रेल्वे स्थानकावर कोळसा केंद्र नाही : मुख्यमंत्री

**मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी शुक्रवारी सभागृहाला आश्वासन दिले की, राज्यातील कोणत्याही कोकण रेल्वे स्थानकावर कोळसा केंद्र उभारले जाणार नाही.आमदार क्रूझ सिल्वा यांच्या लक्षवेधी प्रस्तावाला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले, जर इतर राज्यात नवीन स्थानके जाहीर झाली तर लोक त्याचे स्वागत करतात. येथे काही आक्षेप आहेत. आक्षेप घेणाऱ्यांनी आक्षेपांची लेखी कारणे द्यावीत. योग्य अभ्यास करून आम्ही केंद्राकडे आक्षेप सादर करू. परंतु आम्ही मये थील स्थानकाचे स्वागत करतो. डिचोली आणि मये तालुक्यांसाठी एक स्थानक असले पाहिजे अशी सरकारची भूमिका असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. मात्र या स्थानकांवर कोळसा टाकला जात असल्याच्या मुद्द्यावरून सभागृहात गदारोळ झाला.**

# गॅस लाईन हलवण्यास विलंब झाल्यामुळे अंडरपासचे काम ठप्प

र■ *टीम दैनिक हेराल्ड*

**फोंडा, दि. ७** : गॅस लाईन स्थलांतरीत करण्यास विलंब झाल्यामुळे फोंडा येथील मुख्य केटीसी बस स्टँडजवळील चार पदरी राष्ट्रीय महामार्गावरील अंडरपासचे काम ठप्प झाले आहे, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. केटीसी-नागेशी बांदोडा जंक्शनवरील वाहतूक कोंडीमुळे महामार्गाच्या मुख्य रस्त्यावर वाहनांच्या मोठ्या रांगा लागत आहेत.

येथील अत्यंत आवश्यक असलेल्या अंडरपासचे केवळ ५० टक्के काम पूर्ण झाले आहे आणि प्रवाशांच्या त्रासात भर घालत जुन्या रस्त्यावरील गॅस पाईपलाईन अद्याप संबंधित प्राधिकरणाने (गोवा नॅचरल गॅस प्रायव्हेट लिमिटेड) साफ केलेले नाहीत. स्थानिकांनी त्रास आणि गोंधळ टाळण्यासाठी पावसाळ्यापूर्वी अंडरपासचे काम पूर्ण करण्याची मागणी केली आहे.स्थानिक विनोद नाईक म्हणाले की, पावसाळ्यापूर्वी अंडरपासचे काम पूर्ण करावे अन्यथा प्रवाशांना धोका निर्माण होऊ शकतो.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग अधिकारी एई चंदा परवार म्हणाल्या, अंडरपासचे काम आणि त्याच्या जोडणी रस्त्यांचे पन्नास टक्के काम पूर्ण झाले आहे तर उर्वरित काम रखडले आहे कारण गोवा नॅचरल गॅस प्रायव्हेट लिमिटेडने केटीसी बस स्टँड पोंडा जवळील राष्ट्रीय महामार्ग-७४८ च्या संरेखनाखाली येणाऱ्या त्यांच्या गॅस लाईन्स तात्काळ हलविण्याचे आश्वासन दिलेले नाही.

या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने गोवा नॅचरल गॅस प्रायव्हेट लिमिटेडला पत्र लिहिल्यानंतर, गेल्या वर्षी १८ डिसेंबर २०२४ रोजी दोन्ही अधिकाऱ्यांनी संयुक्त तपासणी केली आणि असे लक्षात आले की केटीसी बस स्टँडवरील अंडरपासच्या बांधकामाअंतर्गत गॅस लाईन येत आहे ज्यासाठी त्वरित स्थलांतर आवश्यक आहे.

या तपासणीनंतर, २ जानेवारी २०२५ रोजी गॅस अधिकाऱ्यांना एक स्मरणपत्र देखील पाठवण्यात आले होते, परंतु आजपर्यंत, गॅस लाईन हलविण्यात आलेली नाही, ज्यामुळे अंडरपासचे बांधकाम रखडले आहे. या अंडरपासचे काम झाल्याशिवाय शापूर फोंडा आणि भोम पर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण होऊ शकत नाही , तर दुसऱ्या बाजूला आहे त्या स्थितीत गॅस पाईप लाईन बाजूला काढल्यास ती तशीच उघड्यावर टांगती ठेवणे धोकादायक ठरू शकते, या दुहेरी अडचणीतून आता सार्वजनिक बांधकाम विभाग आणि गॅस कंपनी या दोघांनी समन्वयाने त्वरीत मार्ग काढावा आणि रोजच्या वाहतूक कोंडीतून आमची सुटका करावी अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

## निवडक

### ४८७ भारतीय नागरिक होणार हद्दपार : ट्रम्प

**वॉशिंगटन, दि. ७** : डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा अमेरिकेची सूत्रे हाती घेतल्यानंतर अनेक निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या नागरिकांना मायदेशी पाठवण्याच्या निर्णयाचाही समावेश आहे. दरम्यान अमेरिकेने बुधवारी त्यांच्या देशात बेकायेशीरपणे राहणाऱ्या १०४ भारतीय नागरिंना मायदेशी पाठवले होते. आता ते अशा पद्धतीने अमेरिकेत राहणाऱ्या आणखी ४८७ भारतीयांना माघारी पाठवणार आहेत. याबाबत केंद्र सरकारच्या वतीने शुक्रवारी माहिती देण्यात आली आहे. पत्रकार परिषदेत या प्रकरणावर बोलताना परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री म्हणाले की, अमेरिकेने केंद्र सरकारला त्यांच्या देशात बेकायदेशीरपणे राहणाऱ्या ४८७ भारतीय नागरिकांची माहिती दिली असून, त्यांच्या हद्दपारीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. पत्रकार परिषदेत बोलताना परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री म्हणाले की, अमेरिकेने भारताला ४८७ संभाव्य भारतीय नागरिकांबद्दल माहिती दिली आहे, ज्यांना हद्दपार करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

### सैन्याकडून ७ पाकिस्तानी घुसखोरांचा खात्मा

**नवी दिल्ली, दि. ७** : भारतीय सैन्याने ७ पाकिस्तानी घुसखोरांना ठार मारले आहे. यामध्ये ३ पाकिस्तानी लष्करी सैनिकांचाही समावेश आहे. माध्यमांच्या वृत्तानुसार, सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ फेब्रुवारीच्या रात्री पुंछ जिल्ह्यातील कृष्णा घाटीजवळ नियंत्रण रेषेजवळ घुसखोरीचा प्रयत्न झाला तेव्हा ही घटना घडली. दिव्य मराठीच्या सूत्रांचा दावा आहे की भारतीय सैन्याच्या पुढच्या चौकीवर हल्ला करण्याची योजना होती. भारतीय सैन्याला याची माहिती मिळाली आणि त्यांनी आधीच हल्ला करून कट उधळून लावला. घुसखोरीदरम्यान मृत्युमुखी पडलेल्या ७ जणांमध्ये पाकिस्तानच्या बॉर्डर ॲक्शन टीम (बॅट) चे ३-४ सदस्यही मृत्युमुखी पडले. ही टीम सीमापार ऑपरेशन्समध्ये माहिर आहे. तथापि, सूत्रांनी दिव्य मराठीला सांगितले की या घटनेत ५ दहशतवादी मारले गेले. यामध्ये इढटीम सदस्यांचा उल्लेख नव्हता. या कारवाईत मारले गेलेले दहशतवादी अल बद्र गटाचे सदस्य असू शकतात, असे सूत्रांनी सांगितले. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी आधीच सांगितले आहे की आम्ही भारतासोबतचे सर्व प्रश्न चर्चेद्वारे सोडवू, अशा वेळी घुसखोरीचा हा प्रयत्न करण्यात आला आहे.

### भारताची 'चांद्रयान-४' मोहिम २०२७ मध्ये

**नवी दिल्ली, दि. ७** : भारत २०२७ मध्ये चंद्रावरील खडकांचे नमुने पृथ्वीवर परत आणण्यासाठी चांद्रयान-४'ही मोहिम प्रक्षेपित करेल. अशी माहिती केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंह यांनी एका मुलाखतीत दिली. यासंदर्भात जितेंद्र सिंह म्हणाले की, भारत २०२६ मध्ये खोल समुद्राचा शोध घेण्यासाठी समुद्रयान' मोहिम देखील प्रक्षेपित करेल आणि गगनयान' ही मोहीम देखील भारतीय अंतराळवीरांच्या पहिल्या तुकडीसह अवकाशात झेपावेल. चांद्रयान-४ मोहिमेचे उद्दिष्ट चंद्राच्या पृष्ठभागावरून नमुने गोळा करणे आणि ते पृथ्वीवर परत आणणे आहे. यामध्ये हेवी-लिफ्ट एलव्हीएम-३ रॉकेटचे किमान २ वेगवेगळे प्रक्षेपण समाविष्ट असतील जे मोहिमेचे ५ वेगवेगळे घटक वाहून नेतील जे कक्षेत एकत्र केले जातील. तसेच गगनयान मोहिमेत भारतीय अंतराळवीरांनी विशेषतः डिझाइन केलेल्या अंतराळयानातून पृथ्वीच्या खालच्या कक्षेत पाठवणे आणि त्यांना सुरक्षितपणे परत आणणे समाविष्ट आहे, पुढील वर्षी ही प्रक्रिया सुरू केली जाणार असल्याचे मंत्र्यांनी स्पष्ट केले. भारत २०२६ मध्ये समुद्रयान देखील प्रक्षेपित करेल, ज्यामध्ये ३ शास्त्रज्ञांना खोल समुद्रात ६ हजार मीटर खोलीपर्यंतच्या पाणबुडीतून समुद्रतळाचा शोध घेण्यासाठी नेले जाईल.

### हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७ ↑ (२३१.१६ )
निफ्टी : २५,२३५.१० ↑ (८३.९५)

# लोकसंख्येपेक्षा मतदार अधिक कसे ? : राहुल गांधी

**नवी दिल्ली, दि. ७ :**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी २०२४ च्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत नोंदणीकृत मतदारांची संख्या राज्यातील प्रौढ लोकसंख्येपेक्षा जास्त असल्याचा दावा करत निवडणूक आयोग आणि भाजप सरकारवर टीकेचे प्रहार केले आहेत. राजधानीत पत्रकार परिषदेत बोलताना, राहुल यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुका आणि नोव्हेंबरमध्ये झालेल्या राज्य विधानसभा निवडणुकांमध्ये मतदार नोंदणीत झालेल्या तीव्र वाढीवर अनेक प्रश्न उपस्थित केले.

गेल्या पाच वर्षात झाली नाही त्यापेक्षा अधिक मतदार वाढ निवडणुकीआधी फक्त पाच महिन्यात कशी काय होऊ शकते असा महत्वाचा प्रश्न राहुल गांधी यांनी उपस्थित केला आहे. अवघ्या पाच महिन्यांत महाराष्ट्राच्या मतदार यादीत ३९ लाखांहून अधिक मतदारांची भर पडली, जी मागील पाच वर्षांत ३२ लाखांपेक्षा जास्त आहे असे निदर्शनास आणून देत गांधी यांनी असा युक्तिवाद केला की यामुळे निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेबाबत गंभीर चिंता निर्माण झाली आहे.

शिवसेना (यूबीटी) नेते संजय राऊत आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) नेत्या सुप्रिया सुळे यांनी देखील यावेळी सरकारवर टीका केली. गांधी यांनी २०२४ च्या लोकसभा आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांसाठी निवडणूक आयोगाने मतदारांचा केंद्रीकृत डेटाबेस उपलब्ध करून देण्याची मागणी केली. जर आयोग त्यांच्या शंका दूर करण्यात अपयशी ठरला तर विरोधी पक्ष - काँग्रेस, शिवसेना (यूबीटी) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) - हे प्रकरण न्यायालयात नेतील यावर त्यांनी भर दिला.

ही तफावत स्पष्ट आहे - महाराष्ट्राची अधिकृत प्रौढ लोकसंख्या ९५.४ दशलक्ष आहे, तरीही विधानसभा निवडणुकीदरम्यान मतदारांची संख्या ९७ दशलक्ष नोंदवली गेली. यामुळे मतदार यादीच्या अखंडतेबद्दल मूलभूत प्रश्न उपस्थित होतात, असे गांधी म्हणाले.

दरम्यान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गांधींचे दावे फेटाळून लावले, निवडणूक आयोगाने या चिंता आधीच दूर केल्या आहेत असे त्यांनी म्हटले. ८

पान २ ▶

# २०२६ अखेरीस प्रत्येक घराला दररोज किमान ४ तास पाणी देण्याचे मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पर्वरी, दि. ७** : २०२६ च्या अखेरपर्यंत राज्यातील प्रत्येक घराला दिवसातून चार तास पाणी मिळावे यासाठी पायाभूत सुविधा उभारण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली. डिचोलीचे आमदार चंद्रकांत शेट्ये यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की राज्यात २४७ पाणीपुरवठा करणे शक्य नाही. मी मान्य करतो की २४७ पाणीपुरवठा करणे शक्य नाही परंतु राज्यातील प्रत्येक घराला चार तास पाणीपुरवठा करण्याची सरकारची योजना आहे आणि त्यासाठी पायाभूत सुविधा विकसित केल्या जात आहेत. २०२६ च्या अखेरीस ते पूर्ण केले जाईल, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री म्हणाले की, पीडब्ल्यूडी प्रक्रिया सुविधा, वितरण नेटवर्क आणि साठवणूक प्रणालींचे अपग्रेड आणि आधुनिकीकरण करण्यासाठी सतत गुंतवणूक करत आहे.

डिचोली आणि मये मतदारसंघांच्या फायद्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग माणकुरे येथे १० एमएलडी जलशुद्धीकरण केंद्राचे बांधकाम, तसेच जलाशय, वाहतूक आणि वितरण पाइपलाइनचे बांधकाम हाती घेत आहे. याशिवाय राज्यातील पाणीपुरवठा सुधारण्यासाठी विविध पाणीपुरवठा योजनांमध्ये वाढ करण्याचे कामही हाती घेतले जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग नुकसान कमी करण्यासाठी आणि प्रक्रिया केलेल्या जलसंपत्तीचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी देखील प्रयत्नशील आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग पाणीपुरवठा यंत्रणेचे रिअल टाइम देखरेखीसाठी स्मार्ट देखरेख प्रणाली राबवत आहे. यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाला पाणी वितरण नेटवर्क सुधारण्यास, गळती शोधण्यास आणि तातडीने दुरुस्त करण्यास आणि २४७ च्या स्वप्नातील उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कार्यक्षमता सुधारण्याच्या संधी ओळखण्यास मदत होईल, असे सावंत म्हणाले.

कळंगुटचे आमदार मायकल लोबो म्हणाले की त्यांच्या मतदारसंघाला दोन दिवसातून एकदा ३० मिनिटे पाणी मिळत असल्याने पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे आणि त्यांनी त्यांच्या मतदारसंघातील सर्व बांधकाम परवाने थांबवण्याची मागणी केली.उत्तर किनारपट्टीचा पट्टा काँक्रीटचे जंगल बनत चालला आहे याकडे लक्ष वेधून लोबो म्हणाले की, या मुद्द्यावर बैठक बोलावून किनारपट्टीतील पाण्याच्या गरजेचा अभ्यास करण्याची गरज आहे. जर ते करता आले नाही तर बांधकाम परवाने रद्द करावेत अन्यथा भविष्यात आपल्याला समस्यांना तोंड द्यावे लागेल, असे लोबो म्हणाले. विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनी २४ तास पाणी देणे शक्य आहे का हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला.तत्पूर्वी, त्यांच्या लक्षवेधी सूचनेद्वारे, डिचोलीच्या आमदारांनी उत्तर गोव्यात विशेषतः डिचोली आणि मयेमध्ये वारंवार होणाऱ्या तीव्र पाणीटंचाईकडे सभागृहाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

# सोन्याच्या किमती उच्चांकावर; गोव्यात दागिन्यांच्या मागणीत २० टक्के घट

**कार्स्टन मिरांडा**
■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ७** : सोन्याच्या किमती आतापर्यंतच्या उच्चांकावर पोहोचल्या आहेत, ज्यामुळे स्थानिक बाजारपेठेत तेजी निर्माण झाली आहे कारण ग्राहक वाढत्या खर्चाशी झुंजत आहेत आणि ज्वेलर्स विक्रीत घट झाल्याचे सांगतात. जागतिक आर्थिक अनिश्चितता, भू-राजकीय तणाव आणि गुंतवणूकदारांची वाढती मागणी हे या तेजीचे प्रमुख घटक असल्याचे उद्योग तज्ज्ञांनी सांगितले आहे.

गोवा गोल्ड डीलर्स असोसिएशन चे अध्यक्ष प्रमित रायकर यांनी पुष्टी केली की शुक्रवार, ७ फेब्रुवारी रोजी सोन्याचा भाव अभूतपूर्व रु. ८५,००० प्रति १० ग्रॅमवर पोहोचला, ज्यामुळे एकाच दिवसात प्रति ग्रॅम रु. १,२०० ची मोठी वाढ झाली. आंतरराष्ट्रीय पातळीवर, सोन्याने प्रति औंस २,८५५ डॉलरचा विक्रमी उच्चांकही गाठला.

अमेरिका आणि चीनमधील व्यापार तणाव, प्रतिशोधात्मक शुल्कासह, गुंतवणूकदारांना सुरक्षित-आश्रयस्थान म्हणून सोन्यात गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले आहे. कमकुवत होत चाललेला अमेरिकन डॉलर, चलनवाढीची चिंता आणि मध्यवर्ती बँकेच्या खरेदीमुळे या तेजीला आणखी चालना मिळाली आहे, असे रायकर यांनी स्पष्ट केले.

सोन्याच्या वाढत्या किमतींमुळे गोव्यात दागिन्यांच्या विक्रीवर लक्षणीय परिणाम झाला आहे. रायकर यांच्या मते, ग्राहकांनी किंमत सुधारण्याच्या आशेने खरेदी पुढे ढकलल्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत मागणीत सुमारे २०% घट झाली आहे.



सोन्याच्या वाढत्या किमतींमुळे दागिने परवडण्यासारखे झाले नाहीत. ग्राहक आता जुने सोने पुनर्वापर करत आहेत किंवा २० कॅरेट आणि १८ कॅरेट सारख्या हलक्या आणि कमी शुद्धतेच्या दागिन्यांचा पर्याय निवडत आहेत, जे मूल्य टिकवून ठेवताना अधिक सुलभ राहतात, असे रायकर पुढे म्हणाले.

गोव्यातील ज्वेलर्स देखील विकसित होत असलेल्या ग्राहक ट्रेंडशी जुळवून घेत आहेत. किंमत-संवेदनशील खरेदीदार पर्याय शोधत असल्याने कमीत कमी साहित्याची आवश्यकता असलेल्या दागिन्यांच्या डिझाइनची लोकप्रियता वाढत आहे, असे त्यांनी नमूद केले.

उल्हास ज्वेलर्सचे व्यवस्थापकीय संचालक विक्रम वेर्लेकर यांनी किंमत वाढीच्या वेळेवर प्रकाश टाकला, जो नोव्हेंबर ते एप्रिल या काळात लग्नाच्या हंगामाच्या पीक हंगामासोबत जुळला आहे.

या काळात लग्न आणि पर्यटनामुळे गोव्यात दागिन्यांच्या विक्रीत वाढ होते. गेल्या डिसेंबरमध्ये सेंट फ्रान्सिस झेवियर प्रदर्शनादरम्यान मागणी जास्त होती. तथापि, अलिकडच्या किमतीतील वाढीमुळे या ट्रेंडमध्ये अडथळा निर्माण झाला आहे, ज्यामुळे अनेक ग्राहकांना सोन्यात गुंतवणूक कधी करावी याबद्दल अनिश्चितता निर्माण झाली आहे, असे वेर्लेकर म्हणाले.

वेर्लेकर यांनी आंतरराष्ट्रीय बाजारातील गतिमानतेकडेही प्रमुख प्रभाव पाडणारे घटक म्हणून लक्ष वेधले. भू-राजकीय अनिश्चितता आणि शुल्क युद्धांमुळे सोन्याचे भाव गगनाला भिडले आहेत. गुंतवणूकदार आणि वित्तीय संस्था महागाईचा सामना करण्यासाठी त्यांचे सोन्याचे साठे वाढवत आहेत, ज्यामुळे किमती आणखी वाढल्या आहेत. सध्याच्या मंदी असूनही, तज्ञांचा असा विश्वास आहे की, अलिकडच्या वित्तीय धोरणातील बदलांमुळे काही दिलासा मिळू शकतो.

अलिकडच्या अर्थसंकल्पात जाहीर केल्याप्रमाणे वैयक्तिक उत्पन्न कर दरात घट आणि कर सवलत मर्यादा रु. १२ लाखांपर्यंत वाढल्याने ग्राहकांचा खर्च वाढू शकतो आणि दागिन्यांची मागणी वाढू शकते, असे रायकर यांनी निरीक्षण नोंदवले.

दरम्यान, बाजार विश्लेषकांचा असा अंदाज आहे की चालू जागतिक आर्थिक अनिश्चिततेमध्ये सोन्याच्या किमती वाढतच राहतील. मुंबईसारख्या प्रमुख भारतीय शहरांमध्ये, २४ कॅरेट सोन्याचा भाव आधीच प्रति १० ग्रॅम ८६,५१० रुपयांवर पोहोचला आहे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पॉट गोल्ड ०.४८% वाढून २,८६७ डॉलर प्रति औंस झाला आहे. जगभरात आर्थिक अस्थिरता कायम असताना, गुंतवणूकदारांसाठी आणि मध्यवर्ती बँकांसाठी सोने ही एक महत्त्वाची मालमत्ता आहे, ज्यामुळे अनिश्चित काळात सुरक्षित गुंतवणूक म्हणून त्याचे स्थान आणखी मजबूत होत आहे.